# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १२.०९.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ११.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ५३ केसेसमध्ये ५६ ईसमावर कारवाई करून एकुण ५,०७,८५३/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये १४ केसेसमध्ये ७६ इसमांवर कारवाई करून एकुण ३,७८,२५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली १,९५८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,६९,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

दिनांक ११.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १२.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— अवैध दारूसाठा जप्त.**

दिनांक ११.०९.२०२६ रोजी, गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, प्लॉट क्र. ५१, चंदननगर, हकिमी हॉर्डवेअर जवळ राहणारा इसम नामे मोहम्मद हुसेन मोहम्मद शेख, वय ६४ वर्षे याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई करून, त्याचे राहते घराचे बाजुला असलेल्या गोडावुनची पाहणी केली असता, तेथे त्याचे ताब्यात विदेशी दारू टुबोर्ग नावाची बियर बॉटल्स ६५० मि.ली. च्या २४ नग बॉटल, तसेच, रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्की १८० मि.ली. च्या ४८ नग बॉटल, देशी दारु भिंगरी संत्रा नंबर १ नावाच्या ९० मिलीच्या १०० बॉटल्स असा अवैद्यरित्या दारूसाठा मिळुन आला. आरोपीस परवाना बाबत विचारणा केली असता, त्याने कोणताही परवाना नसुन, अवैधरित्या विक्री करीत असल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन देशी, विदेशी दारूसाठा, दारु विक्रीचे रोख १२००/—रू. असा एकुण २२,१२०/—रू. चा मुद्द्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा अवैद्यरित्या दारूसाठा बाळगुन विक्री करतांना समक्ष मिळुन आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा येथे कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीस मुद्द्देमालासह इमामवाडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली,

वाहनचोरी पथकाचे पोनि. श्री दिलीप चंदन, पोहवा. अजय शुक्ला, रोशन तिवारी, नितीन वर्मा व सचिन बढीये यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :— अवैध दारूसाठा जप्त.</u>**

दिनांक ११.०९.२०२६ चे १५.३५ ते १६.३० वा. चे दरम्याप, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, हेमु कॉलनी येथे राहणारा असुदाराम नावाचा इसम अवैधरित्या दारुविक्री करीत आहे. अशा माहितीवरुन, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, हेमु कॉलनी, घर क्र. ११/ई/०१, येथे राहणारा असुदाराम तानुमल मनवानी, वय ६६ वर्षे याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे त्याचे राहते घरात विदेशी दारू रॉयल चॅलेंज व्हिस्की, मॅक्डॉल नंबर १, ओकस्मिथ व्हिस्की, रॉयल स्टॅग, आयकॉनिक व्हिस्की, डर्बी स्पेशल व्हिस्की, रॉयल ग्रीन व्हिस्की, ऑस सिजन व्हिस्की, बी—सेवर व्हिस्की, इंपीरियल ब्ल्यु व्हिस्की, ओल्ड मंक रम अशा वेगवेगळ्या कंपनीच्या प्रत्येकी १८० मि.ली. च्या एकुण १०६ नग बॉटल दारूसाठा अवैद्यरित्या मिळुन आला. आरोपीस मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्याचेकडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन विदेशी दारू किंमती २४,९३५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा अवैद्यरित्या दारूचा साठा बाळगुन विक्री करतांना समक्ष मिळुन आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीस मुद्देमालासह जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, युनिट क्र. ६ पथकाचे पोनि. भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे मानकापुर :— जिवे ठार मारणारा आरोपी अटकेत.**

दिनांक ११.०९.२०२६ चे १०.३० वा. ते ११.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी गणेश रुपचंद कणसरे, वय ३० वर्षे, रा. प्लॉट क्र. ३४, डाहाके ले—आऊट, आरती टाऊन मागे, जयभीमनगर, मानकापुर, नागपूर हे आरोपीचा लहान भाऊ नामे राजकुमार उर्फ चिंटु वरखडे, रा. प्लॉट क्र. १३, लोखंडे ले—आऊट, हनुमान मंदीर जवळ, आरती टाऊन मागे यास त्यांचे घरी भेटण्यासाठी गेले असता, तेथे आरोपी नामे शिवकुमार रमेश वरखडे, वय ३० वर्षे हा कुऱ्हाड घेऊन दिसुन आला. फिर्यादीने आरोपीस विचारणा केली असता, त्याने म्टटले की 'मेरे पत्नी का गैरमर्द के साथ चक्कर चल रहा था, ये पत्नी ने मुझे बताया था, इसलिये मैने पत्नी को मार डाला'. यावरुन फिर्यादीने घरामध्ये जाऊन पाहणी केली असता, आरोपीची पत्नी सौ. सविता शिवकुमार वरखड (धुर्वे), वय २६ वर्षे ही दरवाज्यात रक्ताचे थारोळ्यात पडलेली दिसली. आजुबाजुला जमीनीवर रक्त पसरलेले व हिरव्या बांगड्यांचे तुकडे पडलेले दिसुन आले. फिर्यादीने आरोपीचे भाऊ यास फोनद्वारे माहिती दिल्याने, आरोपीचा भाऊने जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन, पोलीस ठाणे मानकापुर येथे पोहवा. राजेश कोचे ९९७०६१६५८६ यांनी आरोपीविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करुन, तात्काळ दखल घेऊन, आरोपी शिवकुमार रमेश वरखडे यास अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे भांडेवाडी :—शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ११.०९.२०२६ चे १८.०० वा. १८.१५ वा. चे दरम्यान, भांडेवाडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, अंबेनगर टॉवर लाईन रोडवर काळ्या रंगाचा फुलशर्ट व निळा जिन्सपॅन्ट घातलेला एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम धुमाकुळ घालतांना दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव गुरुप्रसाद उर्फ लक्की सिताराम सनोडीया, वय २४ वर्षे, रा. शिवनगर झोपडपट्टी, स्नेहा सायकल स्टोअर्स समोर, अंबेनगर रोड, भांडेवाडी नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे कंबरेत एक लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणताहरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा. ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कोराडी :— चोरीचा प्रयत्न करणारे आरोपींना अटक.**

फिर्यादी निखिल लक्ष्मण माकडे, वय ३२ वर्षे, रा. म्हसाळा, नाका क्र. २, कामठी रोड, नागपूर हे पोलीस ठाणे कोराडी हद्यीत पॉवर प्लान्ट येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. दिनांक ११.०९.२०२६ चे २१. ३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे सहकारी सुरक्षा रक्षक यांनी फिर्यादी यांना फोनद्वारे सुचना दिली की, पावर प्लॉन्टची भिंत चढून डब्ल्युटीपी परिसरात दोन इसम संशयीतरित्या येत आहेत. यावरुन फिर्यादी व त्यांचे सहकारी यांनी घटनास्थळी जाऊन बघितले असता, तिथे दोन आरोपी इसम हे वेल्डींग मशिन घेऊन जातांना दिसुन आले. त्यांनी फिर्यादीस बघितले असता, वेल्डींग मशिन तेथेच सोडून पळून जाण्याचे तयारीत असता, फिर्यादी व त्यांचे सहकारी यांनी दोन्ही इसमांना ताब्यात घेतले व पोलीसांना सुचना दिली. कोराडी पोलीसांनी घटनास्थळी येऊन

दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ते विचारले असता, त्यांनी आपले नाव १) इकबाल शेख शरीफ शेख, वय २४ वर्षे, २) शुभम भगवान जाधव, वय २८ वर्षे, दोन्ही रा. वार्ड क्र. ६, महादुला कोराडी असे सांगितले. आरोपींचे ताब्यातून जुनी वापरती वेल्डींग मशिन कि. ८०००/—रू. चा मुद्येमाल जप्त केला आहे. आरोपींचा अभिलेख तपासला असता, आरोपी क्र. २ याचेवर चोरी, जबरी चोरीचे व इतर असे एकुण ०८ गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे सपोनि. विनोद जोकार ८६६९१९४८६१ यांनी आरोपीविरूध्द कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सदर :—</u>** दिनांक ११.०९.२०२६ चे २२.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर येथील बिट मार्शल हे आपले बिटमध्ये रात्रपाळी गस्त करीत असतांना, पोलीस ठाणे हद्दीत एलआयसी चौक ते कामठीकडे जाणाऱ्या पुलावरील पोल क्र. पी—१६५ व १६६ दरम्यान, एक बजाज कंपनीची केटीएम मोटार सायकल क्र. एमएच ४० बीएम ३१९८ ही अपघातग्रस्त तसेच, बाजुला दोन इसम गंभीर जखमी व बेशुध्द अवस्थेत दिसुन आले. पोलीसांनी गंभीर जखमी यांचे जवळुन मिळालेल्या मोबाईल फोनद्वारे त्यांची ओळख पटवुन, १) समीर मोहम्मद शाकीर शेख, वय २० वर्षे २) ऐफाज मोहम्मद जाहीद अन्सारी, वय १५ वर्षे, दोन्ही रा. शिवाजी चौक, यशोधरानगर, नागपूर या दोन्हीही गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्या दोघांनाही तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी सपोनि. दिगांबर राठोड यांनी पोलीस ठाणे सदर येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १४ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००१९९/ २०१० | कलम ३८० भा.दं.वि. | राहुल के मानिकपुरी, वय १८ वर्षे, रा. संत्री मार्केट, बजरंग सायकल स्टोअर्स, नागपुर. | २९.०९.२०२६ |
| २ | मा. १४ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००९५९/ २०१२ | कलम ४,२५ भा.ह.का. | गणपतसिंग देविसिंग ठाकूर वय ३० वर्षे, रा. जाटतरोडी, इमामवाडा, नागपुर. | ३०.०९.२०२६ |
| ३ | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय | ३०२५९६/ २००७ | कलम ३२४ भा.दं.वि. | राजकुमार रामलाल मरकाम, रा. दंतेश्वरी झोपडपट्टी, ऑरेंज सिटी हॉस्पिटल मागे, धंतोली, | ०३.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दंडाधिकारी साहेब, नागपुर. | | | नागपुर. | |
| ४ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ४, नागपुर. | ३०१९३५/ २००८ | कलम ४५४,४५७, ३८१ भा.दं.वि. | सुरज मारोतराव उईके, रा. वैनगंगा कॉलनी, बिल्डींग क्र. ४/१३, धंतोली, नागपुर. | २१.१०.२०२६ |

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**